## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,

मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ जुलै २०१३.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक मत्स्यआ. २००८/प्र.क्र.२०१/पदुम-१२.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून आणि यापूर्वी यासंबंधित अस्तित्वात असलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा विलेख अधिक्रमित करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातील महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय सेवा गट-ब (प्रशासकीय) (राजपत्रित) मधील "प्रशासकीय अधिकारी, नियोजन अधिकारी, अर्थसंकल्प अधिकारी व वसुली अधिकारी" या पदांच्या सेवाभरतीचे विनियम करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना "प्रशासकीय अधिकारी, नियोजन अधिकारी, अर्थसंकल्प अधिकारी व वसुली अधिकारी" गट ब (प्रशासकीय) पदाचे सेवाप्रवेश नियम, २०१३ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) "विभाग" म्हणजे कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग ;

(ब) "शासन" याचा अर्थ महाराष्ट्र शासन.

३. आयुक्त, मत्स्यव्यवसाय कार्यालयातील महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय सेवा गट-ब (प्रशासकीय) (राजपत्रित) मधील "प्रशासकीय अधिकारी, नियोजन अधिकारी, अर्थसंकल्प अधिकारी व वसुली अधिकारी" या पदावरील नेमणुका खालील मार्गाने करण्यात येतील :—

(अ) वरिष्ठ अधीक्षक, मत्स्यक्षेत्र निरीक्षक व निरीक्षक (सांख्यिकी) या पदावर किमान तीन वर्षे नियमित सेवा केलेल्या सुयोग्य व्यक्तींची ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर पदोन्नतीने ;

किंवा

(ब) खालील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने,—

(एक) ज्याचे वय तेहतीस वर्षांपेक्षा जास्त नाही ; परंतु शासन सेवेतील उमेदवाराच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ;

(दोन) ज्यांनी कला/विज्ञान/वाणिज्य किंवा विधी यातील पदवी धारण केलेली आहे.

(तीन) वरील उपखंड (२) येथे नमूद केलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर राज्य किंवा केंद्र शासकीय कार्यालयातील अथवा शासन अंगीकृत कार्यालयात ३ वर्षांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीचा प्रशासकीय किंवा लेखाविषयक कामाचा अनुभव प्राप्त केला आहे.

४. नियम ३ मध्ये नमूद पदावर पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्तीचे प्रमाण ५०:५० राहील.

५. नियम ३ मध्ये नमूद पदावर नियुक्त व्यक्ती दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीवर राहील. परिविक्षाधीन कालावधी एक वर्षापर्यंत वाढविता येईल. त्याने परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे व विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. त्याने परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण न केल्यास अथवा विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास अथवा सदर पदासाठी योग्य नसल्याचे आढळून आल्यास तो सेवा समाप्त करण्यास पात्र राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद पदावर नियुक्त व्यक्तीने या संबंधात विहित केलेल्या नियमानुसार मराठी व हिंदी परीक्षा यापूर्वी उत्तीर्ण केलेली नसल्यास वा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने माहिती व तंत्रज्ञान संचालनालय यांनी वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी संबंधीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ मध्ये नमूद पदावर नियुक्त व्यक्ती महाराष्ट्रात कोठेही बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनिल डिग्गीकर,**

शासनाचे सचिव.

Scanned by CamScanner